MHND100002012024

म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्रमांक ०१/२०२४
कल्पना विरुध्द नागोराव व इतर

<u>निशाणी क्र.०३ खाली आदेश</u>
(दिनांक १९/०६/२०२५)

प्रस्तुत अर्जाव्दारे अर्जदाराने गैरअर्जदाराकडुन दरमहा अर्जदारांना रुपये १५,०००/- अंतरीम पोटगी मंजुर करावी म्हणुन दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, तिचे लग्न गैरअर्जदार क्र.१ सोबत दिनांक १२.६.२००९ रोजी विधी-परंपरेप्रमाणे झाले होते. लग्नानंतर ती गैरअर्जदारासोबत सासरी मानसपुरी येथे नांदावयास गेली. ती गैरअर्जदारासोबत एकत्र कुटूंबात नांदत होती. तिला तिच्या पतीपासून वैवाहिक जीवनातून दोन मुली नामे आनंदी नागोराव विभुते व वंदना नागोराव विभुते असे दोन अपत्य जन्माला आलेले आहेत. तिला तिच्या पतीपासून दोन्ही पण मुली जन्माला आल्याने तिचे पती तिला म्हणाले की, ''मला मुलगा पाहिजे होता, तुला मुलगी झाली, तु माझे वंश बुडवतीस का'' म्हणून तिला सासरी घेऊन जाण्यास तयार नव्हते. गैरअर्जदाराने तिला म्हणत होते की, ती अपशकूनी आहे, ती आली तेव्हापासून त्यांना सुख नाही. तिच्या आई-वडीलांनी व भावाने तिच्या पतीला खूप विनंती केली तेव्हा तिच्या पतीने तिला नांदावयास घेऊन गेले. तिचे पती तिला म्हणाले की, तुला जर त्यांच्यासोबत संसार करायचा असेल तर टॅक्टर घेण्यासाठी तुझ्या माहेरहून आई-वडीलांकडून पाच लाख रूपयाची बेकायदेशीर मागणी करून छळ करीत होते. तिचे पती व सासू-सासरे तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करीत होते. दिनांक ३.६.२०२२ रोजी तिच्या पतीने तिला जीवे मारण्याच्या उद्देशाने मोटारसायकलवरून खाली पाडल्याने तिला गंभीर मार लागला होता. तिच्या पतीने दोन-तीन वेळा तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केला.

३. तिचे पुढे असे ही कथन आहे की, दिनांक २७.१२.२०२३ रोजी तिचे पती, सासू-सासरे यांनी तिला घरात राहायचे असेल तर ट्रॅक्टर घेण्यासाठी माहेरहून पाच लाख रूपये घेऊन ये अन्यथा तिला घरात येऊ देणार नाही आणि जर घरात परत आली तर जीवे मारून विहीरीत फेकून देईल, असे म्हणत तिला मारहाण करून घराबाहेर हाकलून दिले. त्यानंतर तिने भावाला बोलावून घेऊन भावासोबत माहेरी आली. अर्जदारास कोणतेही उत्पन्नाचे साधन नसुन ती स्वत:चा व दोन्ही मुलीचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. याउलट गैरअर्जदाराकडे चांगल्या दर्जाची शेती असून त्यामधून दरमहा दहा लाख रूपये उत्पन्न गैरअर्जदाराला मिळते. याव्यतिरिक्त गैरअर्जदाराकडे १५-१७ दुधाच्या म्हशी असल्याने दुग्ध व्यवसायातून देखील दरमहा ५०-६० हजार उत्पन्न मिळते. गैरअर्जदाराचे उत्पन्न पाहता अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे मुळ अर्जाचा निकाल लागेपावेतो गैरअर्जदाराकडुन अर्जदार व तिच्या दोन्ही मुलीला दरमहा रुपये १५,०००/- व घरभाडे रूपये ५०००/- अशी अंतरीम पोटगी मंजुर करावी अशी विनंती अर्जदाराने केली आहे.

४. गैरअर्जदारांनी सदर अर्जावरील त्यांचे म्हणणे निशाणी क्र.०९ दाखल करून असे कथन केले की, अर्जदाराच्या अर्जातील मजकूर खोटा असून गैरअर्जदारास मान्य नाही. अर्जदार क्र.१ ची सुरूवातीपासून नांदण्याची इच्छा नव्हती. ती अतिशय भांडखोर वृत्तीची आहे. गैरअर्जदार क्र.२ व ३ वयोवृद्ध असून ते इतराच्या मदतीशिवाय चालू देखील शकत नाहीत. त्यामुळे त्यांनी अर्जदारास त्रास दिला हे कथन शक्य वाटत नाही. अर्जदाराच्या आडमुठ वृत्तीमुळे गैरअर्जदार क्र.१ ने दिनांक २०.७.२०१८ रोजी वकीलामार्फत नोटीस पाठविली होती. गैरअर्जदाराकडे कोणतीही दुभती जनावरे नाहीत. त्यांच्याकडे असलेली शेती पूर्णत: कोरडवाहू आहे. अर्जदार ही भांडण करून अचानक माहेरी निघून जात होती. गैरअर्जदार क्र.१ ने त्याच्या आई-वडीलांना सोडून विभक्त तिच्यासोबत राहावे अशी तिची इच्छा आहे. त्याने तसा प्रयत्न करून देखील तिच्या वागण्यात कुठलाही फरक पडला नाही. तो आजही तिला नांदविण्यास तयार आहे. परंतू तिची नांदण्याची इच्छाच दिसून येत नाही. ती स्वत:च नांदत नसेल तर त्याची जबाबदारी गैरअर्जदारावर निश्चीतच नाही.

५. अर्जदार व गैरअर्जदाराच्या वकीलांचा अर्ज व त्यावरील उत्तर प्रमाणे युक्तीवाद

ऐकला.

६. सदर प्रकरणामध्ये अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र. १ यांच्यामधील विवाह नातेसंबंध, त्यामधून उभयतांना झालेले अपत्य इत्यादी बाबत कोणताही वाद नाही. सध्या स्थितीला गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदारांच्या खावटीबाबत काही प्रयोजन केल्याचे अभिलेखावर काहीही दाखल केले नाही. अर्जदाराने दाखल केलेल्या दस्तावरुन गैरअर्जदार क्र. १ कडे शेती असल्याचे दिसून येते. याऊपर गैरअर्जदार क्र. १ ने त्याला शेतीचे उत्पन्न असल्याची बाब नाकारली नाही. त्यामूळे त्याची कमवण्याची ऐपत आहे असे अभिलेखावरुन प्रथमदर्शी दिसून येत आहे.

७. सदरहू अंतरीम पोटगीच्या अर्जावर निर्णय देण्याअगोदर अर्जदाराच्या पतीची कमविण्याची ऐपत, जर असेल, विचारात घेणे आवश्यक आहे. सध्या स्थितीला गैरअर्जदार शेती करीत असल्याचे प्रथमदर्शी दिसून येत असल्याने आणि त्याने अर्जदाराची कोणतीही व्यवस्था न करता तिच्याकडे व तिच्या मुलीकडे दूर्लक्ष केल्याचे दिसून येते. त्यामूळे गैरअर्जदार क्र. १ ची कमविण्याची ऐपत, नैतिक जबाबदारी व सध्याची दैनंदिन जीवनशैली ,सदर प्रकरणाच्या वस्तूस्थिती व परिस्थिती मध्ये अर्जदार क्र. १ ते ३ हे गैरअर्जदार क्र. १ कडून दरमहा अंतरिम खावटी रक्कम रुपये ३०००/- प्रत्येकी मिळण्यास पात्र आहेत. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज (निशाणी ०३) अंशतः मंजूर करण्यात येते. |
| २. | गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ ते ३ यांना दरमहा रक्कम रुपये ३०००/-(तीन हजार रूपये) प्रत्येकी अंतरिम पोटगी प्रस्तूत अर्ज दाखल दिनांक ०५.०२.२०२४ पासून मूळ अर्जाचा अंतीम निकाल लागेपर्यत दयावी. |

| | |
|---|---|
| ३. | प्रस्तूत अर्जाच्या आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना मोफत देण्यात यावी. |

KUNDLIK SUDHAKAR KHANDARE

Digitally signed by KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Date: 2025.06.19 17:10:11 +0530

दिनांक :१९.०६.२०२५

(के.एस.खंडारे),
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, कंधार.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File judgment are same, word to word, as per the original judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Mrs J P Ghogare |
| Name of Court | Court of JMFC Kandhar |
| Date of Dictation and date of order | 19.06.2025 |
| Judgment / order signed by the P.O.on | 19.06.2025 |
| Judgment / order uploaded on | 19.06.2025 |